सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
कार्यालय पोलीस आयुक्त, नागपुर शहर
पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाईन्स, नागपुर - ४४०००१
दुरध्वनी क्र. - 0712–2590601, फॅक्स क्र. - 0712–2534716, ई.मेल - cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक : पोआना/आस्था/सआलि-५/पो.शि.भरती२०२४-२५/२०२६, 2966 नागपुर शहर दिनांक १०/०३/२०२६

# पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर
# पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर या आस्थापनेवर पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेची शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी दिनांक ११/०२/२०२६ ते ०७/०३/२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, जुना काटोल नाका चौक, नागपुर शहर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता मुदतवाढ मिळण्यास विनंती केलेले उमेदवार तसेच ज्या उमेदवारांची पोलीस भरती करीता लागोपाठ दिनांक आल्यामुळे या आस्थापनेवर मिळालेल्या दिनांकास उपस्थित राहु शकले नाही, त्यांची शारीरीक चाचणी दिनांक १४/३/२०२६ रोजी सकाळी ०४.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. करीता आपणास शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी देण्याकरीता **एक शेवटची संधी** देण्यात येत असुन आपण **दिनांक १४/३/२०२६ रोजी सकाळी ०४.३०** वाजता पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, जुना काटोल नाका चौक, नागपुर शहर येथे न चुकता उपस्थित राहावे. त्यानंतर पोलीस शिपाई पदाची शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात येणार नाही. याबाबत संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या उमेदवारांनी वैद्यकिय कारणास्तव मुदतवाढ मिळण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी वैद्यकिय अधीकारी यांचे मैदानी चाचणी करीता पात्र (Fit)असल्याबाबत प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक राहील.

टिप :
१) उमेदवारांनी अर्जात नमुद केलेल्या कारणाची सत्यता पडताळणी करण्यात येईल. उमेदवारांनी अर्जात नमुद केलेले कारण वैध असेल तेव्हाच उमेदवारास पुढील शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी करण्याची संधी देण्यात येईल.
२) उमेदवारास ईतर घटकात हजर असल्याबाबतचा लेखी पुरावा सादर करणे आवश्यक आहे. सदरहु पुरावा सादर केल्यानंतरच उमेदवारास पुढील शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी करण्याची संधी देण्यात येईल.
३) या घटकाचे पोलीस शिपाई भरतीचे प्रवेशपत्र, ईतर घटकाचे प्रवेशपत्र सोबत घेऊन यावे.

( नविनचंद्र रेड्डी )
सह पोलीस आयुक्त
नागपुर शहर

प्रति,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, नागपुर शहर
२/- आपण सदरहु सुचना नागपुर शहर पोलीस दलाच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहीतीकरीता प्रसिध्द करण्यात यावी.

F:\CORROSPONDANCE.DOCX72